## <u>निशाणी क्र. ३४ खाली आदेश</u>

गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांनी त्यांनी दिनांक ०२.०२.२०२४ रोजी अधिवक्ता श्री. ठोंबरे यांनी सादर केलेले म्हणणे मागे घेण्यास परवानगी द्यावी आणि त्यांना विविज्ञ श्री. ए. एस. पुराणिक यांच्यामार्फत लेखी म्हणणे सादर करण्यास परवानगी द्यावी, अशी या न्यायालयास विनंती केली आहे.

०२. गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, त्यांचे पुर्वीचे अधिवक्ता श्री. ठोंबरे यांनी त्यांना त्यांनी हा अर्ज दाखल केला त्याच्या तीन तारखांपासून प्रकरणाचे टप्पाबाबत माहिती दिली नाही आणि त्यांच्या सुचनांचे पालन केले नाही. तसेच अधिवक्ता श्री. ठोंबरे यांनी त्यांचे निर्देश न घेता किंवा त्यांच्याकडून स्पष्ट सुचना न मिळता, त्यांचे लेखी म्हणणे तयार करुन न्यायालयात सादर केले. गैरअर्जदार क्र. २ ही विधवा आणि अशिक्षीत आहे गैरअर्जदार क्र. ४ ची अज्ञान पालक आहे. तिला अधिवक्ता श्री. ठोंबरे यांनी खटल्याचे टप्प्याबाबत आणि या न्यायालयाचे निशाणी २६ वरील आदेशाबाबत माहिती दिली नाही.

०३. गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांचे असे सुद्धा म्हणणे आहे की, त्यांनी अधिवक्ता श्री. ठोंबरे यांच्यातर्फ नियमीत दिवाणी दावा क्र. १६/२०१० दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होऊन पृथक कब्जा मिळण्यासाठी दाखल केला होता. त्या दाव्यामध्ये अधिवक्ता श्री. ठोंबरे यांनी या प्रकरणात नमूद केलेली वंशावळ मान्य व कबूल केली होती आणि वंशावळीप्रमाणे अंबऋषी घंटे यांचे सर्व वारस असल्याचे मान्य केले होते. परंतु, या प्रकरणात दाखल केलेल्या त्यांच्या म्हणण्यामध्ये विरोधाभास असून ते वस्तुस्थितीशी निगडीत नाही. त्यांचे पुर्वीचे अधिवक्ता श्री. ठोंबरे यांनी त्यांची फसवणूक केली आहे आणि या शिवाय दावा लिहिताना अनेक चुका केल्या आहेत. त्यामुळे विसंगती निर्माण केली आहे. अधिवक्ता श्री. ठोंबरे यांनी केलेली फसवणूक त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी नवीन विधीज्ञ नियुक्त केले आहेत. अधिवक्ता श्री. ठोंबरे यांनी त्यांची जबाबदारी पार पाडलेली नाही. त्यात ते अपयशी ठरले आहेत.

थोडक्यात अशाप्रकारे करत त्यांनी त्यांचा अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी या न्यायालयास विनंती केली आहे.

०४. अर्जदारांतर्फे अर्जदारांच्या वकील साहेबांनी सदरच्या अर्जाला हरकत घेतलेली नाही.

०५. या न्यायालयाने गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांचे पुर्वीचे अधिवक्ता श्री. ठोंबरे यांचेदेखील म्हणणे मागवले. त्यांनी या अर्जावर त्यांचे म्हणणे लिहून दिले आहे. त्यांचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, अर्ज व त्यात नमूद केलेला मजकूर खरा नाही व तो त्यांना कबूल नाही. सदरच्या अर्जाद्वारे गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांनी पुर्णपणे खोटे आरोप केले आहेत. यापुर्वी गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांच्या सांगण्याप्रमाणे म्हणणे दिलेले आहे. अर्जदार हे गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांचे जवळचे नातेवाईक आहेत. अर्जदारांच्या सांगण्यावरुन त्यांचे बरोबर संगनमत करुन गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांनी सदरचा अर्ज व म्हणणे दिले आहे. सदरच्या अर्जावरुन अर्जदार व गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांच्यामध्ये तडजोड झालेली दिसून येत आहे. यापुर्वी गैरअर्जदाराने शपथपत्रावर म्हणणे दिले आहे. त्यांनी गैरअर्जदाराला वेळोवेळी तारखेबाबत माहिती दिली आहे. केवळ वकीलपत्र बदलल्यामुळे खोटे आरोप करुन गैरअर्जदारांनी म्हणणे दिले आहे. सदरच्या अर्जाबाबत कायद्यामध्ये कोठेही तरतुद नाही. त्यांनी वकील पत्रासोबत सर्व कागदपत्रे गैरअर्जदाराला दिलेली आहेत. थोडक्यात अशाप्रकारे कथन करत त्यांनी अर्ज रद्द करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

०६. या न्यायालयाने अर्जदारांचे विद्वान वकील साहेब, गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांचे सध्याचे विद्वान वकील साहेब श्री. पुराणीक आणि त्यांचे पुर्वीचे विद्वान वकील साहेब श्री. ठोंबरे यांचे म्हणणे ऐकले व सदर प्रकरणाचे अभिलेखाचे अवलोकन केले. असे दिसून येते की, या न्याायालयाने सर्वप्रथम दिनांक २३.०८.२०२३ रोजी निशाणी १ खाली सदरचे प्रकरण गैरअर्जदार क्र. १ ते ४ यांच्या लेखी उत्तराशिवाय चालविण्यात येत आहे

असा आदेश पारीत केला. त्यानंतर गैरअर्जदार क्र. २ हिने स्वत:करिता व गैरअर्जदार क्र. ३ व ४ ची अ.पा.क. आई म्हणून सदरचा आदेश रद्द करुन तिने त्या दिवशी दिलेले म्हणणे स्विकारण्यात यावे, अशी या न्यायालयास विनंती केली होती. या न्यायालयाने दिनांक २१.०२.२०२४ रोजी गैरअर्जदार क्र. २ हिला स्वत:करिता व गैरअर्जदार क्र. ४ करिता ५००/– रुपयांच्या खर्चावर म्हणणे सादर करण्यास परवानगी दिली. तसेच असे सुद्धा दिसून येते की, त्याच दिवशी गैरअर्जदार क्र. २ हिने स्वत:करिता आणि गैरअर्जदार क्र. ३ व ४ ची अ.पा.क. आई म्हणून शपथपत्रासह तिचे म्हणणे सादर केले. असे जरी असले तरी, त्यानंतर गैरअर्जदार क्र. २ हिने निशाणी २६ वरील आदेशाची पुर्तता केली नाही. करिता, पुन्हा या न्यायालयाने दिनांक २३.०७.२०२४ रोजी निशाणी १ खाली तिच्या लेखी उत्तराशिवाय सदरचे प्रकरण चालविण्यात येत आहे असा आदेश पारित केला. त्यानंतर दिनांक २५.०९.२०२४ रोजी गैरअर्जदार क्र. २ ने स्वत:करिता व गैरअर्जदार क्र. ४ चे अज्ञान पालनकर्ता म्हणून सदरचा अर्ज दाखल केला आणि त्यामध्ये तिने वर परिच्छेद क्र. १ मध्ये नमूद करण्यात आलेले कथन करुन तिचा अर्ज मंजूर करण्यात यावा, अशी या न्यायालयास विनंती केली.

०७. येथे हे नमूद करण्यात येते की, गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांनी निशाणी ४० वरील यादीसोबत त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या नियमीत दिवाणी दावा क्र. १६/२०२० मधील वादपत्राची सत्यप्रत दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, त्यात त्यांनी अर्जदारांनी या प्रकरणामध्ये नमूद केलेली वंशावळ दर्शविली होती. याउलट, गैरअर्जदार क्र. २ हिने निशाणी २६ वरील अर्जासोबत दाखल केलेले दिनांक ०२.०२.२०२४ रोजीचे शपथपत्रासह म्हणणे लक्षात घेता, असे दिसून येते की, त्यात तिने या अर्जातील मजकूर बरोबर नसल्याचे कथन केले आहे आणि या अर्जामध्ये नमूद केलेली मिळकत सि.स.नं. १८७७ या मिळकतीचे फक्त गैरअर्जदार क्र. १ ते ४ हेच वारस आहेत, असे कथन केले आहे. अशाप्रकारे गैरअर्जदार क्र. २ हिने निशाणी क्र. २६ वरील दाखल केलेल्या म्हणण्यामध्ये आणि सदर नियमीत

दिवाणी दावा क्र. १६/२०२० मधील वाद पत्रातील गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांच्या म्हणण्यामध्ये तफावत असल्याचे दिसून येते. परंतु, वर नमूद केल्याप्रमाणे गैरअर्जदार क्र. २ हिने निशाणी क्र. २६ वरील अर्जासोबत दाखल केलेले दिनांक ०२.०२.२०२४ रोजीचे म्हणणेसोबत शपथपत्र देखील दाखल केले आहे. सदरचे शपथपत्र हे दिनांक ०२.०२.२०२४ रोजीच या न्यायालयाचे सहायक अधिक्षक यांचेसमक्ष करण्यात आले होते असे दिसून येते. त्यामध्ये गैरअर्जदार क्र. २ हिने तिच्या म्हणण्यामध्ये जे काही कथन केले आहे त्याचीच पुनरावृत्ती केल्याचे दिसून येते. ही बाब लक्षात घेता, गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांनी त्यांचे पुर्वीचे अधिवक्ता श्री. ठोंबरे यांच्याबाबत जे वक्तव्य केले आहेत त्याबाबत साशंकता निर्माण होते. असे जरी असले तरी, गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांचे उक्त नमूद नियमीत दिवाणी दावा क्र. १६/२०२० मधील वाद पत्रातील कथन लक्षात घेता, निशाणी २६ वरील आदेश लक्षात घेता आणि अर्जदारांनी या अर्जाला हरकत घेतली नसल्याची बाब लक्षात घेता, न्यायाच्या हितासाठी त्यांना त्यांचे नव्याने लेखी म्हणणे सादर करण्याची परवानगी देता येईल. तसेच मी येथे हे नमूद करतो की, गैरअर्जदार क्र. २ हिने निशाणी २६ वरील अर्जासोबत जे ०२.०२.२०२४ रोजी लेखी म्हणणे सादर केले होते त्यावर न्यायालयाने आदेश पारित केला नसल्याचे आणि त्याला निशााणी क्रमांक दिला नसल्याचे दिसून येते. ही बाब लक्षात घेता आणि वरील विवेचन लक्षात घेता, गैरअर्जदार क्र. २ हिला तिचे सदरचे म्हणणे मागे घेण्याची परवानगी सुद्धा देता येईल. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:–

## <u>आदेश</u>

गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांना त्यांनी दिनांक ०२.०२.२०२४ रोजी दाखल केलेले म्हणणे मागे घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.

०२. तसेच गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांना त्यांनी या अर्जासोबत दाखल केलेले लेखी म्हणणे दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

०३. गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांनी पुढील तारखेपर्यंत निशाणी २६ वरील खर्चाच्या आदेशाबाबतची पुर्तता करावी.

Digitally signed by ANKUSH PUNDLIKRAO KHANORKAR
Date: 2025.01.30 15:28:55 +0530

बार्शीः (अंकुश पुं. खानोरकर)
दिनांकः २७.०१.२०२५. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, बार्शी.

**CERTIFICATE**

I affirm that contents of this PDF file Order /Judgment are word to word same, as per the original Order /Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Shripad N. Chilka, Stenographer Grade-2. |
| Name of the Court | : Civil Judge Sr. Division, Barshi. |
| Judgment / order signed by the Presiding Officer on | : 27.01.2025 |
| Judgment / Order uploaded on | : 30.01.2025 |